## मा. यशवंतरावांनी विविध विषयांवर प्रबोधिनीत मांडलेल्या मुद्द्यांचे संकलन

### राष्ट्र जागृती मंडळ

- वाद्यबंदी आणि विरोध, दंग्यांच्या ठिकाणी ठरवून मिरवणुका काढणे
- १ ऑगस्टचे मेळावे
- मंडळाशी संलग्न सदस्य - पु. ग. सहस्रबुद्धे, शिवाजीराव भोसले, सुरेश व्यंकटेश धायगुडे (हिंदुत्वविषयक ग्रंथाचे लेखक, प्रबोधिनीचे नियमित देणगीदार), बाबा कुलकर्णी (तळासरी), चांगदेव पाटील, अशोकराव हिरवे, प्रतापराव शिंदे (जातिनिर्मुलन संस्था, महात्मा फुलेंनी सुरू केलेल्या साप्ताहिकाचे उत्तरदायित्व), प्राध्यापक धारणे, वसंतराव व कुसुमताई नारगोळकर (कैनाड विज्ञानाश्रम, ठाणे), माधवराव मेहेंदळे (Gandhi Memorial Leprosy Foundation, संस्था मित्रता संघ, रा. स्व. संघाचे प्रचारक म्हणून आसाम मध्ये काम, नंतर तिथल्या एका शाळेचे मुख्याध्यापक, परत आल्यावर संघाच्या भारतभरातील कामाचे इतिवृत्त लिहिणे) – इत्यादी प्रेरणासंपन्न व्यक्तिमत्त्वे, नोकरी-व्यवसाय सांभाळून, तडजोडी करून जिद्दीने कामाच्या पाठीमागे उभे राहणे, शक्य त्या मार्गाने सहभागी होणे.
- शिवणे रस्ता बांधणी, पानशेत पूर मदतकार्य

### प्रबोधिनीची स्थापना

- आप्पांचा सहविचारात्मक नेतृत्वपद्धती विषयीचा प्रबंध – नूमवित संशोधनाचे प्रयोग – तीन गटांमध्ये वेगवेगळ्या नेतृत्वपद्धती वापरून किल्ले बांधण्याचा उपक्रम. तिन्ही गटांसाठी स्वतंत्र निरीक्षक. त्यातल्या निष्कर्षांमधून प्रबंधलेखन - केवळ PhD पुरते मर्यादित राहून काय होणार, ही पद्धती वापरून नेते प्रत्यक्ष कोण घडवणार, म्हणून प्रबोधिनीची स्थापना.
- तीन आप्पासाहेब – आप्पासाहेब पेंडसे, कोटीभास्कर, सोहोनी - तिघेही मिळून घटनेचा विचार करत होते
- प्रबोध शाळेची रचना (१९६२-६८) – विद्यार्थ्यांना मुख्य जेवण (शालेय अभ्यासक्रम) इतर शाळांमधून मिळत होतं. पौष्टिक आहार इथे मिळत होता. इंग्रजी आणि गणिताचे तास, परिस्थिती ज्ञानाच्या तासांवर भर – देशातील महत्त्वाच्या घडामोडींवर चर्चा, आयडा स्कडर चरित्र, दररोज मैदानी खेळ, त्यातून व्यक्तिमत्व विकसन.  अध्यापनाचा मुख्य उद्देश – देशप्रश्न समजून घेणे व सोडवणे, कुठलाही विषय शिकवताना हीच भूमिका डोळ्यासमोर ठेवून शिकवायचा.
- CBSE परीक्षण समिती शिफारस – इमारत नाही, वर्गखोल्या नाहीत, विद्यार्थी नाहीत.. अभिनव कल्पना आहेत. त्यामुळे मान्यता दिली. न्यू इंग्लिश स्कुल, नूमवि या शाळांमध्ये सुरुवातीला वर्ग व्हायचे. नंतर परांडे वाड्यातील खोल्यांमध्ये. किशाभाऊ पटवर्धन यांनी मुंबई-पुणे प्रथम वर्गाचा प्रवास करून मिळवून दिलेल्या देणग्या. शाळेसाठी जागा मिळवण्यासाठी खटपट. बांधकामासाठी महानगरपालिकेतून देणगी मिळवण्याकरता महापौर आणि सर्वपक्षीय नगरसेवकांच्या सदिच्छा भेटी. जसजशा लहान-मोठ्या देणग्या मिळत गेल्या, तसं बांधकाम होत गेलं.

- शालान्त परीक्षांमध्ये सलग काही वर्षे लौकिक यश मिळाल्याने प्रबोधिनीचं सगळीकडे नाव झालं. १९६८ साली CBSE बोर्डाची मान्यता मिळून प्रशाला सुरू झाल्यावर राज्यस्तरीय शालान्त परीक्षांशी संबंध राहिला नाही.

**शिक्षणविषयक विचार**

- ज्ञान-स्नायू कौशल्य-संवेदनक्षमता हा त्रिकोण. शिक्षणात ज्ञानावर अधिक भर, तिथे स्नायू कौशल्य आणि संवेदनक्षमता वाढवल्या पाहिजेत. प्रशिक्षणात स्नायू कौशल्यांवर अधिक भर, तिथे ज्ञान आणि संवेदनक्षमता वाढवल्या पाहिजेत. तिन्हीत समतोल आणला पाहिजे.
- शिक्षणातील देशाटनाचे महत्त्व. खरं शिक्षण देश बघण्यातून होतं. रामदास स्वामी, विवेकानंद, भगिनी निवेदिता या सर्वांची खरी शिक्षणं तशीच झाली. आपल्याकडे पूर्वीची पद्धतही तीच होती. गुरूगृही काही महिने पोथीशिक्षण होत असे आणि चातुर्मासात कृषी व अनुभवशिक्षण होत असे. प्रबोधिनीतही हीच पद्धत आपण काही प्रमाणात वापरतो. अभ्यास दौरे, आपत्ती काळात मदतकार्यासाठी धावून जाणे यातून खरं शिक्षण होतं.
- विद्यारंभ, विद्याव्रत, उपनयन या सर्व संस्कारांचा संबंध धर्मापेक्षा शिक्षणाशी अधिक आहे. आधुनिक शिक्षणशास्त्रातील ज्या संकल्पना आपल्या जुन्या धार्मिक परंपरांमध्ये सापडतात, त्या निवडून, त्यांचा अभ्यास करून नवीन रुपात मांडण्याचे काम. व्रत म्हणजे काय, विद्या म्हणजे काय, पंचकोश कुठले, त्यांचा विकास कसा करायचा, वाढ आणि विकास यातला फरक या सर्व गोष्टी समजून उमजून केल्या पाहिजेत. त्यासाठी संस्कारापूर्वी व्याख्यानांचं आयोजन.
- प्रबोधिनीचे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम जे आता सार्वत्रिक झाले आहेत - गणेशोत्सवात बरची नृत्य, व्यक्तिमत्त्व विकसनाचे तास, प्रकल्प पद्धती, साखरशाळा

**ग्रामविकसन**

- १९५७-५८ साली कल्याण गावात जाऊन वृक्षारोपण, प्रबोधिनीची स्थापना होण्यापूर्वीपासून ग्रामविकसनाचे काम
- कुष्ठरोग निवारण – शिवाजीराव पटवर्धन, डॉ. वाडदेकर, बाबा आमटे
- अण्णा हजारे, पोपटराव पवार, रवींद्र कोल्हे, दिलीप कुलकर्णी यांचे काम समजून घेतले पाहिजे

**उद्योग**

- आर्थिक स्वावलंबनासाठी उद्योग, आप्पांच्या बालपणी त्यांनी अनुभवलेल्या ‘खरी कमाई’ उपक्रमाचा परिणाम. किर्लोस्करांनी आधी यंत्र आणि नंतर काम दिलं. परांडे वाड्यातील स्नानगृहात पहिल्यांदा ते यंत्र ठेवलं. नंतर कडबा कुट्टीच्या जागी आणखी काही यंत्र. हळूहळू झालेली वाढ. ग्रामविकसनाची जोड. त्यामुळे शिवापूरला जागा मिळवून तिथे यंत्रशाळा उभारणी.
- यंत्रशाळा – आर्थिक स्वावलंबनासाठी सुरुवात, उद्योगातून उत्पादन-उत्पादकाने संशोधन केले पाहिजे- शिक्षणातून संशोधक वृत्ती निर्माण केली पाहिजे, त्यामुळे शिक्षण-संशोधन-उद्योग हा त्रिकोण.

- सुरुवातीला मधुमक्षिकापालन प्रक्रिया यंत्राचे उत्पादन – मधातील जलांश काढून टाकण्यासाठी. ती यंत्रे देशभर गेली. दुसऱ्या टप्प्यात शंतनूराव किर्लोस्करांच्या सहकार्याने Oil Engines चे सुटे भाग तयार करणे, तिसऱ्या टप्प्यात फ्रेंच तंत्रज्ञान वापरून क्षणमापक व धारक उत्पादन. त्याचीही देशभर केंद्रं झाली. त्यात प्रशिक्षण घेतलेल्या नांगरे गृहस्थाने नंतर परस्पर इतर ठिकाणी कारखाना काढला. त्यामुळे आपल्या मागणीत घट.
- काही काळ खूप नफा मिळवून देणारे उद्योग कालांतराने तोट्यात जाऊ लागले. विविध कारणांनी ६०-७० लाखांचे कर्ज झाले. ते फेडण्यासाठी वांद्रेकर बागेतील जागा आणि डॉ. भाजेकरांनी देणगी म्हणून दिलेली जागा या विकाव्या लागल्या.

**प्रबोधिनीचे हिंदुत्व**

- धर्मांतर प्रश्न – हिंदुकरण प्रयत्न – मसुरकर आश्रम (मसुराश्रम), मुंबई; मीनाक्षीपूरम् प्रतिक्रिया – पुण्यातील अन्य प्रांतीय लोकांचे मेळावे
- ख्रिस्तीकरणाचा अभ्यास – मिशनरी कार्यपद्धती – नकाशाबद्ध योजना
- हिंदू संघटनातील अडचणी – अनेक पंथोपपंथ, त्यांचे प्रमुख, ते मानणाऱ्या लोकांची संख्या, त्यांची बलस्थाने इत्यादी माहितीचा अभाव
- हिंदुत्वाची व्याख्या – सावरकरांच्या व्याख्येत सुधारणा (भूमीनिष्ठेपेक्षा समाजनिष्ठा महत्त्वाची) – अर्जुनवाडकर यांच्याकडून रचना करून घेतली, मुसलमान-ख्रिस्ती-पारशी इत्यादी अन्य धर्मीय वर्ज्य नाहीत, उदाहरणे - रसखान, मुल्ला अली अब्बास, जस्टीस मोहम्मद अली छागला, उपराष्ट्रपती हिदायतुल्ला (निवृत्तीनंतर प्रबोधिनीत गणेश प्रतिष्ठापनेसाठी आले होते), सय्यदभाई, रेव्हरंड टिळक
- प्रबोधिनीचे ध्येय – धर्मसंस्थापना - संस्थापना म्हणजे सम्यक स्थापना
- गीतेतील श्लोकाचा संदर्भ – सज्जनांचे संरक्षण व दुष्टांचे निर्दालन
- धर्म म्हणजे समाजाची धारणा होणे, अभ्युदय व नि:श्रेयस दोन्हीची प्राप्ती ज्यापासून होते तो धर्म
- हिंदू जीवनदृष्टी – उपास्यानां अनियम: साधनानां अनेकता
- समाजपुरुषातच देवाचे दर्शन – सेवाधर्म – भगिनी निवेदितांनी प्लेगच्या साथीदरम्यान केलेल्या सेवेचे उदाहरण
- ज्ञान आणि विज्ञान यात द्वैत मानलेलं नाही. अनुभवांतून आलेलं, प्रयोगांतून आलेलं ज्ञान हिंदू धर्मात मान्य आहे, तात्त्विक धर्म हा शाश्वत आहे, आचरण धर्म परिवर्तनीय आहे
- हिंदू धर्माची माहिती करून घेतली पाहिजे, इतरांना ती उत्तमपणे देण्याची व्यवस्था केली पाहिजे
- आप-पर भाव समजला पाहिजे. आपल्या देशाच्या हिताचं काय आहे, हे समजलं पाहिजे आणि समाजात काय अनिष्ट चालू आहे ते ओळखता आलं पाहिजे, त्याचा प्रतिकार करता आला पाहिजे
- स्वत:च्या आचारात करारीपणा, कट्टरपणा आणला पाहिजे
- जीवनाच्या सर्व क्षेत्रांत संघटना घडवू, व्यक्तीच्या विकासातून कार्याचा विकास, कार्याच्या विकासातून समाजाचा विकास, समाजाच्या विकासातून राष्ट्राचा विकास ही साखळी
- देशातील प्रत्येक समस्या ही आपलीच समस्या आहे, या व्यापक भूमिकेतून काम. कामाला मर्यादा घालून घेतलेली नाही

- स्व चा आग्रह, स्वभाषा, स्वलिपी, स्वदेशी, सौर कालगणना, राष्ट्रीयतेचा संस्कार. कालानुरूप सगळ्यांत बदल करण्याची तयारी

**संत्रिका आणि पौरोहित्य**

- १९७५ पासून संस्कृत-संस्कृती-संशोधिकेच्या कामाला सुरुवात, पहिल्या टप्प्यात श्री. कृष्णराव अर्जुनवाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत साहित्याचे वाचन आणि चर्चा, अर्जुनवाडकरांचे वास्तुसार प्रकरणांचे लेखन
- धर्म निर्णय मंडळाशी असलेला संबंध, आप्पा आणि कोकजे शास्त्रींचे सहचिंतन, परांडे वाड्यात सामूहिक श्रावणीचा पहिला विधी. पुढे धर्म निर्णय मंडळाच्या कामात आपण पुष्कळ भर घातली.
- मागणी तसा पुरवठा या तत्त्वानुसार काम. एखाद्या संस्काराची मागणी आली की त्यासाठी आवश्यक अभ्यास करून पोथीची रचना तयार करायची. या पद्धतीने हळूहळू अनेक पोथ्या तयार झाल्या.
- सार्थता, सामूहिकता, शिस्त, समभाव ही चतु:सूत्री
- बौद्ध-जैन-शीख-लिंगायत यांना वेगळी स्मृति (कायदा) नसल्याने ते वेगळे धर्म नाहीत, पंथच आहेत. धार्मिक संस्कार कसे करायचे हा नवबौद्धांपुढे प्रश्न – प्रत्येक ठिकाणी वंदनाच (....शरणं गच्छामि) म्हटली जाते
- पुरोहितांसाठी आचारशुद्धी – देश, काल, क्रिया, द्रव्य, कर्तृ, उच्चार

**विविध ठिकाणचे दौरे**

- तमिळनाडू – हिंदीविरोधी आंदोलन, दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा. विरोध भाषेला नसून लिपीला, शालेय शिक्षणात हिंदी-संस्कृतचे तास प्रामाणिकपणे होत नसल्याचा परिणाम, राजगोपालचारींची भेट
- १९६५ साली युद्धभूमीला एकट्यानेच भेट – लालबहादूर शास्त्रींची मुंबईतली सभा, तरुण भारत प्रतिनिधी ओळखपत्र, यशवंतराव चव्हाण भेट, गो. नी. दांडेकरांची बसमधील भेट, जम्मू-प्रेमनाथ डोगरा भेट, कॅप्टन आदी इराणींसोबत सियालकोट युद्धभूमी दर्शन, परत आल्यावर अनुभवांवर आधारित लेखमाला, विद्यार्थ्यांसमोर भाषणं
- १९६७ साली गोमंतक अभ्यास दौरा – फर्मानगुढी, चिंबळ या ठिकाणांना भेटी
- कुठल्याही दौऱ्यांमध्ये देशप्रश्न समजून घेणं हाच उद्देश, प्रेक्षणीय स्थळे बघणे नाही

**संकीर्ण**

- आप्पांच्या बरोबर १९५७-५८ साली भूदान चळवळीच्या वेळी विनोबांचे व्याख्यान ऐकले, सत्यसाईबाबांचे व्याख्यान ऐकले
- सावरकरांची प्रबोधिनीविषयीची प्रतिक्रिया – काम पसंत आहे, नाव बदला – ज्ञान प्रबोधिका, समास करण्यास सोपे - प्रबोधिकाधिकारी इत्यादी, सैनिकीकरणाविषयीचे व्याख्यान जवळून ऐकले
- विवेकानंद काय म्हणाले – पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार केले, राष्ट्रद्रष्टे विवेकानंद – शीर्षकाची अपूर्वाई – हिंदुराष्ट्रद्रष्टे म्हणून पहिल्यांदा संबोधन, अन्य लेखकांच्या मते ते निधर्मीच होते, काळ मासिकात आलेले अभिप्राय

- निवेदिता चरित्र – भैय्याशास्त्री वाटवे यांचे आप्पांना आठवणीचे पत्र, १९६७ साली जन्मशताब्दी, राष्ट्रसेविका समितीतील अनेकांपर्यंत पुस्तकाच्या प्रती पोचवणे, आप्पांचा स्वत:च्या प्रकाशनाचा आग्रह
- १९६२ साली चिनी आक्रमणाच्या वेळी नवबौद्ध समाजात जाऊन प्रबोधनपर भाषणे, बाजीराव कांबळे
- राजस्थान – सती प्रथेविरुद्ध आंदोलन
- दारूबंदी आंदोलन, फर्ग्युसन महाविद्यालयात फी वाढ विरोधी आंदोलन

**संदर्भ**


१. २०१० साली संत्रिकेत ‘प्रतिज्ञाग्रहण का व कशासाठी’ या विषयावर झालेले व्याख्यान

२. २०११ साली संत्रिकेतील पुरोहितांशी ‘आचारसंहिता’ या विषयावर झालेला संवाद

३. २०११ साली प्रज्ञा मानस संशोधिकेत ‘तत्त्वसप्तकाची ओळख’ या विषयावर झालेले व्याख्यान

४. २०१२ साली नचिकेत नित्सुरे याने घेतलेली प्रदीर्घ मुलाखत (भाग १ ते ४)

५. २०१४ साली मासिक वैचारिकात ‘ प्रबोधिनीच्या इतिहासतील महत्त्वाच्या घटना व कार्यकर्ता घडण’ या विषयावर झालेले व्याख्यान

६. २०२१ साली गौरव ग्रंथाच्या निमित्ताने मनीषाताई शेट्ये यांनी घेतलेली मुलाखत